२१ जून २२
मंगळवार

# खेळ मांडियेला

रिक्त मनात सहजच विचार आला - माझ्या विवाहाला आज तीन वर्ष झाली आणि नुकतीच आमच्या संसारात 'शुक्राची चांदणी' चमकली. आम्ही उभयता खूप सुखावलो म्हणून आमच्या गोंडस बाळाचे नाव 'खुशी' ठेवले. मधु-मालतीच्या वेलीवर - पाकळीपाकळी नाजूक कळी डौलाने खालीवर झोके घेत होती. आमच्या आनंदाच्या डोहात आनंदतरंग एकामागुन एक मोठमोठे गोल निर्माण करत होते. खुशीच्या खुशीमुळे उजाडणारा प्रत्येक दिवस वाऱ्याच्याही पुढे धावत असतांना - श्रावणसरीसुद्धा हलके हलके बरसत होत्या. मुग्ध कळीचे टप्पोरे फूल होऊन - क्षितीजापर्यंत सुगंध दरवळेल असे उंचउंच मनोरे बांधत असतांनाच, संसाराच्या नभांगणात अवकाळीच ढगांचा गडगडाट विजेचे तांडव रंगून - विजांचा कडकडाट होणार असल्याची कोणालातरी कल्पना असते का? निसर्गाने आपले रुद्ररूप दाखवले आणि नियतीच्या अंतरंगात वेगळ्याच योजनांची अंमलबजावणी चालू होती. सरड्याने रंग बदलावे तसे नियतीनेही पाठोपाठ आम्ही मांडलेल्या समाधानी संसाराचा खेळ मोडून टाकला. छप्पर फाडफाड फाडले, माझ्या डोक्यावरचे भक्कम छप्पर उडवून दूर फेकले. चौपाटीवर जाऊन सागरात पाय बुडवल्यावर पायाखालची जमीन खोल खोल सरकते - वावटळ वेगाने गोलगोल फिरतांना हातील धूलीकण - पाने जशी सैरभैर फिरतात - अगदी तसेच - माझ्या दुःखाच्या वावटळीत माझ्या पायाखालची जमीन सरकू लागली. चंचल मन सैरभैर होऊन विचार भरकटू लागले. डोकं सुन्न झालं - अवेळीच तिन्हीसांज झाल्यासारखं वाटू लागलं - माझा पुढील जीवनपट डोळ्यासमोर उभा ठाकला. मन भोगद्यातून रेल्वे पुढे गेल्यावरसुद्धा गाडी रुळावरूनच धावते, तशीच मी देखील - शिणलेल्या मनानं - थकलेल्या पायांनी - भिजलेल्या डोळ्यांनी - अशाश्वतीत - वाट न दिसणाऱ्या जीवनाच्या वाटेवरून अधीर - जड पावलांनी पाय ओढत ओढत चालत होते - कारण हातपाय हलवावे लागणारच होते, पण निश्चित दिशा सापडतच नव्हती. कोणासाठी न थांबता - काळाची कालक्रमणा अखंड चालू असते हेच सत्य - त्याचा हात धरून त्याच्याबरोबर चालतांना पावलोपावली मनोमनी माझ्या खुशीची निष्पाप छबी दिसत होती. यापुढे आम्ही दोघी कोणाकडे बघणार होतो? काय करणार होतो? सगळेच डांबरीरस्ते उखडले होते. फुटलेल्या रस्त्याच्या खाचखळग्यात पाय अडकत होते, नशीबाच्या सत्वपरिक्षेचा पेपर कठिण होता - तो सुटता सुटेना - कारण प्रश्नांचे उत्तर सापडतच नव्हते. सरतेशेवटी मन दगडाहून घट्ट करून - छोटा व्यवसाय - नोकरी - उद्योग शोधता शोधता - पायाला ठेच लागून - वेगळ्याच वाटेवर नकळत वळले - परंतु ही वेगळीवाट एका वेगळ्याच दगडांनी बांधले की मोह हे लक्षात न येता, तिथेच चुकून अडकले - थांबले - आपली फसवणूक झाल्याचे कळले, पण बाण हातातून सुटून गेला होता - ही परतीची वाट नव्हतीच दार तो

PTO

ती डेड एंड होती. आता तिथून पाय मागे घेता येणारच नव्हता. जाता पुढे जाऊ की वळू मागे या विचाराला जागा नव्हती, नकळत इकडे आड तिकडे विहिर दिसत होती. तिथला नाकाव मिळणारा पैसा खोटा - गंजलेला - होता. आता गळ्याभोवतीच्या फासात मान अडकली होती - फक्त फास आवळला जात नव्हता. अशा कातरवेळी 'खुशी' नजरेसमोरून हटत नव्हती. गडबडलेली - गांगावलेली - गोंधळलेली अशी आई शोधणारी माझी 'खुशी'. माझं निष्पाप बाळ. बाळ, " आकाशस्थ ग्रह कोणतेच ग्रह वाईट नसतात - फक्त ह्या ग्रहांच्या वाईट परिस्थितीत जन्म घेणारे जीव - शत्रू - मित्र - वक्री ग्रहांच्या चौकटीत पडलेले असतात. आणि स्वामी ग्रहांच्या मदतीने आपले चांगले वाईट कर्म करत असतात. अशाच ग्रहांच्या परिस्थितीत माझा जन्म झाला असावा असं वाटतं. आपल्याच विपरित काही विपरित बुध्दीने, कुंटणखान अडकलेला कैदी शिक्षा भोगून झाल्यावर बाहेर येतो किंवा होणाऱ्याच घरात राहणारा एखादा डोंबकावळा पुन्हा पुन्हा तिथेच राहून तिथला हिशोब चुकता करून, कंटाळा आल्यावर उडून जातो, परंतु अशा चिखलाच्या घरातून उडून येणाच टिकाऊ घर बांधायला मला, खूप काळ घालवावा लागला. पण कमीजास्त वेळात - उत्तम भाजलेल्या विटा - वाळू - माती - सिमेंट जमवून मी आपलं हक्काचं घरटं बांधायला आज ना उद्या उडून येईनच - हा माझा निर्धार आहे, ध्यास आहे - निसर्गचक्रानुसार तू आता मोठी झाली असशील, तुझा भूतकाळ समजल्यानंतर लोकांनी मला अनेक नावे ठेवली असतील ~~तर~~ दुराचारी लोकांमध्ये काही सदाचारी असतात; अशांनी तुलासुध्दा सुरक्षित जपलं असेल, कुहूकुहू असा पंचमस्वर लावणाऱ्या कोकिळाप्रमाणे तू माझी 'आई' कुठे आहे असा टाहो फोडत असशील. पण तुला एक सत्य सांगते 'देव एकाचवेळी सर्व दरवाजे बंद न करता - कुठेतरी एखादी फट - एखादा मार्ग मोकळा ठेवतो,' आईसाठी तळमळत असलेल्या तुला - पाहून, एखाद्या देवदूताने त्याच मोकळ्या मार्गावरून तुला - एखाद्या आश्रमशाळेत - किंवा सेवाभावी संस्थेत - निराधार योजनेच्या रुपी, आपल्या मनातला स्वार्थीपणा फेकून तुला सुरक्षित ठिकाणी नेऊन ठेवले असेल - तिथे तू शहाणी - जाणती झाली असशील, पण मी मात्र इथे एका दलदलित खोल खोल रुतून - रुतून सुटकेच्या महामार्ग शोधण्याची अखंड धडपड अथकपणे करते आहे. ही माझी मनापासूनची अथक धडपड मला नक्कीच तुझ्यापर्यंत पोहचवेल याबर विश्वास ठेव. आज मी तुला माझ्या मनाला फसवून - मनाविरूध्द अडकलेल्या नळगल्लीतून लिहित आहे गं! पण ते कुठल्या पोस्टपेटीत टाकू? जेणेकरून ते तुझ्यापर्यंत नक्की पोचेल हा विचार करते आहे. विचाराला दिशा नक्की मिळेल - [illegible] गाठभेट नक्कीच होणार आहे.

माझं काळीज असलेल्या माझ्या खुशीला -

देवाशपथ - आणि तुझी शपथ - खरं लिहिन - खरं सांगेन - खोटं सांगणार नाही.

P To

३

PAGE NO.: ३
DATE: / /

मी तुझी गुन्हेगार आहे, मला क्षमा कर - सुरवातीलाच सांगते

आपण दोघी दोन ध्रुवावर आहोत. अनाथ आहोत पण ध्रुवाजवळच असलेले हे सप्तर्षीच आपल्याला एकत्र आणतील. या पत्रातून तुला एक सत्य सांगते - तुझ्या जन्माच्यावेळी माझी सुखरूप सुटका करण्यासाठी - आपल्याच या गावातील एक 'पिराबाई' नावाची 'सुईण' आली होती. ती सर्व गर्भवतींसाठी पारंपारिक सुईण ओळखली जायची. ती आपल्या आजीची खात्रीची होती - अनुभवी होती. तिनेच माझी सुखरूप सुटका केली. त्यावेळी मी, माझ्या सवयीनुसार तिचं नाव - गाव - पत्ता - नातेवाईक - तिचा फोटो - तिने सुटका केलेल्या बाळंतिणींच्या घराचे - सासरमाहेरचे पत्ते - घरांचे फोटो - तिचा स्वतःचा फोटो, घेतला होता - हे सर्व आजही आपल्या घरातल्या माझ्या कपाटात सुरक्षित आहे. त्यानुसार सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट पुरावा, मी तुला देऊ शकते त्यामुळे हा सूर्य हा जयद्रथ हे सिद्ध होऊ शकते म्हणून सांगते, तू अनाथ नाहीस, तुला वडिल होते, आणि तसा मी आपला तिघांचा एक फोटोसुद्धा जपून ठेवला आहे. त्यावेळी तू लहान होतीस. तू वेगळ्या - वाटेवरच्या घसरड्या चिखलातून जन्म घेतलेली कमलिनी नाहीस, तर माझ्या पवित्र संसार मंदिरातल्या, परमेश्वराच्या मंगलमूर्तीसमोर, मंदप्रकाशित तेवणारी - उजळणारी 'दीपज्योती आहेस'. भविष्यात माझे हे पत्र, तुझ्यासाठी स्पष्ट पुरावा आहे, हे लक्षात ठेव आणि जपून ठेव. आता तू शिक्षणाने - विचाराने - मताने सक्षम - समर्थ आहेस - हे पत्र वाचल्यावर तुझा माझ्यावरचा विश्वास उडून जाईल पण हातले शेवटचे दोन शब्द वाचतांनाच, तुझ्या मनात माझ्याविषयी मातृप्रेम सांडेल, पण तुझ्या पापण्यांमध्ये जलबिंदू तरळतील - भूमीवर टपटप गळतील - रागाने तू लालबाल होशील, तुझ्या मनात प्रेमाच्या जागेवर तिरस्कार रुजेल आणि तूच मला प्रश्न विचारशील "अगंऽऽ आई चिखलदरीत अडकण्यापेक्षा तू - धुणीभांडी - स्वयंपाक - पोळ्याकरून देणे - मुले सांभाळणे - त्यांना शाळेत पोचवणे - शिवण कामासारखे अन्य उद्योग करून पैसा मिळवणे अशी कामे का शोधली नाहीस? एखाद्या समृद्ध आचारविचार - सत्शील वागणूक असलेल्या - समृद्ध घरात - चारित्र्यपूर्ण घरात - दवाखान्यात थोडीफार कामे करूनसुद्धा तुला पैसा मिळवता आला नसता का? याचाच अर्थ ही वेगळीवाट - हा चिखलदरा - तुला झटपट पैसा मिळवून देणारा होता, म्हणून हा मार्ग पत्करलास - हे खरं का? सांग"

"बेटा तुझे विचार योग्यच आहेत, मात्र मन समजून घेण्याची तुझ्यासाठी - ही योग्य वेळच नाही हे मी अमान्य करत नाही, पण देवाशपथ खरं सांगते, तुझ्या विचाराप्रमाणे मी एका आश्रमशाळेत विद्यार्थिनींना शाळेत नेण्या आणण्याचे काम करत होते. रोज हे काम करत असतांना तेथीलच एका बाईशी माझी ओळख झाली आणि त्या शाळेत मी खोट्या नावाने आणि मधल्या वेळात एका स्त्रीचे कपडे धरपोच करण्याचे काम स्विकारले आणि मग ती 'वेगळीवाट' रूप घेत - धपत चलाखीने सोडून पळून आले - जिथे मला 'कोणीच' खऱ्या नावाने ओळखणार

नाही. आणि म्हणूनच आज तिथूनच पोस्टाच्या मदतीने तुला हे पत्र लिहून पाठवत आहे, अर्थातच खरी माहिती न देता हं, तुझी अनेक प्रकाराने इथल्या लोकांजवळ विचारपूस करून तुझी थोडी माहिती मिळवली आहे मी. काळियाच अडचणीत सापडलेल्या एका बाईला, मदत आणि सोबत करण्यासाठी रात्रीचं काम घेतले- जिथे माझी चौकशी करायला कोणी येणारच नाही. एक दिवस एका वृद्धाश्रमात जाण्याचा योग आला. तिथे ज्येष्ठ नागरिकांसाठी ध्यान करण्याचा कार्यक्रम चालू होता. कार्यक्रमात मुली ध्यान वृक्ष करतांना पाहिल्या. काही बायका तो कार्यक्रम संपल्यावर काही बायका 'खुशी' नावाच्या मुलीविषयी बोलत होत्या 'अहोऽऽ ती मुलगी तिला सोडून गेलेल्या तिच्या आईविषयी काही सांगत होती, पण ती मुलगी मात्र आईसाठी अधीर - हळवी झाली होती," हे ऐकून माझं काळीज चर्र झालं, चिरत गेलं! तात्काळ काहीतरी कारण काढून मी, हा कार्यक्रम करणाऱ्या मुलींच्या जवळच असलेल्या त्या ठिकाणाचा पत्ता शोधून हे पत्र योग्य पोस्टात टाकून तुझ्यापर्यंत नक्की पोचण्याची व्यवस्था केली, आजची रात्र मी तुलाच डोळे भरून बघत होते- तुझ्याविषयी माहिती मिळाल्यामुळे मी हरखून, हरपून गेलेली होते. पण तुला भेटायला आल्यावर, तु माझ्याशी बोलशील की नाराज होशील- पाठ फिरवशील- हा महत्वाचा प्रश्न होता. माझ्याविषयी तुला काहीच शंका येऊ नाही म्हणून जरीकाही तु तिऱ्हाईत मुलगी समजून, मासे पत्र तुझ्या हातात दिलं आणि हे पत्र तुझ्यापर्यंत पोचव असं सांगितलं- आणि तूसुद्धा तुमचं काम मी नक्की करीन असं आश्वासन दिलस. रात्री झोपतांना प्रार्थना केली 'परमेश्वरा' माझं काळीज माझ्या हृदयाशी भिडू दे- मनातला माझा ठावठिकाणा समजताच तू- मला भेटायला आलीस अन् काळ्या ढगांचा पडदा पुढे सरकताच 'झाले मोकळे आकाश' म्हणत म्हणत जिवाशिवाची गळाभेट झाली, तू आईऽऽ म्हणालीस, मला घट्ट मिठी मारलीस आपला भूतकाळ पुसला गेला, अन् भविष्यकाळ उज्वल होण्यासाठीच आपल्या निवाऱ्याच दुसरच नांव निवडून परमेश्वराला नतमस्तक झालो" आता मी तुला हव ते शिक्षण देऊन उच्च विद्याविभूषित नक्कीच करेन ग- इतकच नाही तर, तुझा मनपसंत जोडीदार अष्टांग निरखुन पारखुन तुझा उच्चशिक्षित हात त्याच्या हातात देऊन- तुझ्या बाबांच कर्तव्य तुझे वडिल होऊन पुर्णत्वाला नेईन, जीवन सार्थकी लावेन. आपला पूर्वकाळ विसरून तुझ्यापासून लांब, पण- तुझ्याजवळच असेन. व्यक्त असून अव्यक्त असेन. जगांत जन्माला येतांना माणूस एकटाच येतो आणि जगसोडून जातांना एकटाच जातो. गृहप्रवेश करतांना घराचा उंबरठा ओलांडावाच लागतो, ओलांडल्यावर मात्र तुझं आराध्य- तुझं प्रेम- तुझं कुटुंब सर्वांना एकत्र बांधून ठेवणारी

PTO.

५

PAGE NO. : ५
DATE : / /

श्रध्दा - सबुरी - दृढविश्वासाची गाठ पदराला बांधून ठेव. कालांतराने मी असेन - मी नसेन पण आईचा हा महामंत्राच तुला नावाप्रमाणे सुख देईल आणि त्यासहाय्याशिवाय कुठलीही वेगळी वाट तुझी फसवणूक न करता - कल्याणाच्या महामार्गाचे दाखवेल हा माझा आशीर्वाद.



व्हिडिओ पहा

सुधा मराठे
Mo - 9921215334

